नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९० Issue - 190 | वार रविवार दि. ३० नोव्हेंबर २०२५ Blow- Sunday Date 30 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## वर्ल्डकप जिंकणाऱ्या अंध क्रिकेट टीमने घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय महिला संघाने (अंध क्रिकेट) आज पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. या भेटीत पंतप्रधान मोदींनी सर्व खेळाडूंशी आपुलकीचा संवाद साधला.

मराठमोळी फलंदाज आणि अंध महिला क्रिकेटच्या टीम इंडियाची उपकर्णधार गंगा कदम ही देखील यावेळी उपस्थित होती. पंतप्रधानांच्या भेटीनंतर तिने आपल्यास आनंद झाल्याचे म्हटले. मात्र, वडिलांच्या आठवणीने भावुक झाली.

मला आज आनंद झाला, शाळेत असताना मी क्रिकेट खेळायला सुरुवात केली, ऋमुलांसोबत मी क्रिकेट खेळायची, ऋनंतर सोलापूरला अंध शाळेत गेले, त्यानंतर मुंबईला कीर्ती कॉलेजमध्ये आले.

नुकतेच ऋमाझे वडील वारले, आज ऋत्यांना खूप आनंद झाला असता, ऋत्यांनी नेहमी सपोर्ट केला,ऋमदत केली असे सांगताना वडिलांच्या आठवणीने गंगा भावुक झाली होती

मोदींसमवेतच्या भेटीनंतरचा हा क्षण घरी ऋगरिबी होती, आज ते जिथे कुठे असतील तिथून बघत असतील, असेही गंगाने यावेळी म्हटले.

नार्मल क्रिकेट इतकेच मेहनत अंध क्रिकेटमध्ये आहे, ऋअंध क्रिकेटमध्ये तर जास्त मेहनत करावी लागते. ऋलोकांनी सर्वांना महत्व दिलं पाहिजे, ऋमला माहिती होतं की आम्ही जिंकलो तर भविष्यातील पिढ्यांना फायदा होईल म्हणून जिंकायचं होतं, असेही गंगाने यावेळी म्हटले.



महिला क्रिकेट संघातील माझी आवडती खेळाडू जेमिया आहे. कारण ती मुंबईची आहे, ऋरोहित शर्मा पुरुष संघात मला आवडतो, यापूर्वीचा धोनी आवडता खेळाडू आहे, असेही तिने म्हटले.

मला ७ नंबर जर्सीला हवा होता, ऋतो मिळाला नाही तर मग ००७ घेतला, ऋइंग्लंडला गेलेले तेव्हा कळलं की जेम्स बाँडाचा हाच नंबर आहे, असेही गंगाने सांगितले.

# सार्वजनिक क्षेत्रातील सहा बँकांचं होणार विलीनीकरण? सरकारची तयारी सुरु

## एकत्रीकरणाच्या पुढील टप्प्यासाठी सर्व सहा बँका रडारवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या आणखी कमी होणार आहे. सरकार सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे मोठ्या बँकांमध्ये विलीनीकरण करत आहे. लहान बँकांच्या जागी एक मोठी बँक आणण्याचे उद्दिष्ट आहे, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता सुधारेल. सरकार बँकांची संख्या कमी करण्याच्या तयारीत आहे. परंतु वित्तीय क्षेत्र सुधारण्यासाठी, कर्ज देण्याचे विस्तार करण्यासाठी आणि बॅलन्स शीट आणि ऑपरेशन्स सुधारण्यासाठी एक मजबूत संस्था निर्माण करु इच्छिते. या संदर्भात, आणखी सहा लहान सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे विलीनीकरण करण्याची तयारी सुरू आहे.

इंडियन ओव्हरसीज बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युको बँक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया आणि पंजाब अँड सिंध बँक या सहा लहान सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे डझख, बँक ऑफ बडोदा, झछइ, कॅनरा बँक किंवा युनियन बँकेत विलीनीकरण केले जाऊ शकते. एकत्रीकरणाच्या पुढील टप्प्यासाठी सर्व सहा बँका रडारवर आहेत.

यापूर्वी, नीती आयोगाच्या अहवालात असे सुचवण्यात आले होते की सरकारने सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि इंडियन ओव्हरसीज बँक सारख्या लहान बँकांचे खाजगीकरण करावे किंवा पुनर्रचना करावी. राष्ट्रीय थिंक टँकचा असा विश्वास आहे की भारत सरकारने पंजाब नॅशनल बँक (पीएनबी), बँक ऑफ बडोदा (बीओबी), कॅनरा बँक किंवा स्टेट बँक ऑफ इंडिया यासारख्या काही मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना कायम ठेवावे. तर उर्वरित लहान सार्वजनिक क्षेत्रातील बँका खाजगीकरण किंवा विलीनीकरणाचा पर्याय निवडू शकतात किंवा सरकारचा हिस्सा कमी करू शकतात.

अहवालांनुसार, इंडियन ओव्हरसीज बँक एसबीआय किंवा पीएनबीमध्ये विलीन होऊ शकते. सेंट्रल बँक ऑफ इंडिया पीएनबी किंवा बीओबीद्वारे ताब्यात घेतली जाऊ शकते. एसबीआय किंवा बीओबी बँक ऑफ इंडिया ताब्यात घेऊ शकते. बँक ऑफ महाराष्ट्र पीएनबी किंवा बीओबीमध्ये विलीन होऊ शकते.


यापूर्वी, २०१७ ते २०२० दरम्यान, १० लहान सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे चार बँकांमध्ये विलीनीकरण करण्यात आले, ज्यामुळे देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची संख्या २०१७ मध्ये २७ वरून १२ झाली. स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पटियाला, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर आणि भारतीय महिला बँक स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली.

ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स आणि युनायटेड बँक ऑफ इंडियाचे पंजाब नॅशनल बँकेत विलीनीकरण झाले. देना बँक आणि विजया बँक बँक ऑफ बडोदामध्ये विलीन झाली. सिंडिकेट बँक कॅनरा बँकेत विलीन झाली. आंध्र बँक आणि कॉर्पोरेशन बँक युनियन बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली आणि अलाहाबाद बँक इंडियन बँकेत विलीन झाली.

## तेलंगणाहून निघालेले दाम्पत्य बेपत्ता, विहिरीत आढळली कार; ग्रामस्थांची गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा: तेलंगणा राज्यातील सीतापूरम येथून जळगाव खान्देश येथे लग्न सोहळ्यासाठी कारने निघालेलं दाम्पत्य बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान गायब झाल्याने नातेवाईक व मित्र परिवारामध्ये खळबळ उडाली होती. जिल्ह्याीतल वडनेर भोलजी परिसरात हे दाम्पत्य रहस्यमयरित्या बेपत्ता झाल्यानंतर त्यांच्यासाठी शोधमोहिम सुरू करण्यात आली. याबाबत दाम्पत्याच्या नातेवाईकांनी नांदुरा पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी शोध घेतला असता येथील एका विहिरीत कार आढळून आली





आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कार विहिरातून बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, ही कार गायब झालेल्या पाटील दाम्पत्याचीच असल्याचं आता समोर आलं असून दोघांचेही मृतदेह कारमध्ये (पान २ वर...)

## नई जिंदगी चौक खून प्रकरणी आरोपीला जन्मठेप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

### अति. जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूरचा निर्णय

सोलापूर (प्रतिनिधी) : नई जिंदगी चौकामध्ये भरदिवसा झालेल्या खून प्रकरणात आरोपी मुस्ताक नासीर पटेल (वय ३६, रा. सिद्धेश्वर नगर, भाग-४) यास अति. जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. हा निर्णय मा. श्री. प्रशांत पी. राजवैद्य, अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर यांनी दिला. तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये आरोपीस चार महिन्यांचा कारावास आणि एक हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. निकाल दिनांक - २८ नोव्हेंबर २०२५

खटल्याची पार्श्वभूमी...

फिर्यादी अलिमोददीन शमशोददीन पटेल, रा. गज्जम नगर, नई जिंदगी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. मृत व्यक्तीचे नाव शकिल शमशोददीन पटेल असून तो फिर्यादीचा भाऊ आहे.

दि. १२ जून २०२० रोजी सकाळी १०.४५ च्या सुमारास अमन चौक-मजरेवाडी रोडवरील पठाण हॉटेलसमोर आरोपी मुस्ताक पटेल व मृत शकिल पटेल यांच्यात वाद झाला. आपण आमच्या मुलांवर खोटे केस करता काय? असा सवाल मृताने करताच आरोपी संतापून कमरेत ठेवलेला चाकू काढला आणि छाती, पोट, हात व पाठीवर असे एकूण ११ वार करून शकिलचा खून केला. गुन्ह्यानंतर आरोपीने चाकू गटारात फेकून घटनास्थळाहून पलायन केले. नंतर तो स्वतःहून एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर झाला.

तपास आणि सुनावणी...

तपास पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांनी केला, तर कोर्ट पैरवी श्रीमती एस. एस. घाडगे, महिला पो.हवालदार यांनी केली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

सरकारी पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील डॉ. प्रदिपसिंग मो. राजपूत यांनी काम पाहिले. आरोपीचा बचाव ॲड. यू. डी. जहागीरदार यांनी केला.

सरकारी पक्षाने सादर केलेला पुरावा भक्कम असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या



प्रकरणात तीन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष, घटनास्थळी सापडलेले रक्ताचे डाग, जवळच आढळलेला चाकू, तसेच आरोपी व मयताच्या कपड्यांवरील रक्ताचे नमुने - हे सर्व पुरावे फॉरेन्सिक अहवालात गुन्ह्याशी पूर्णपणे सुसंगत आढळले. शवविच्छेदनात मयताच्या अंगावर ११ चाकूच्या जखमा असल्याचे नमूद आहे.

न्यायालयाचा निष्कर्ष...

सरकारी पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपी मुस्ताक नासीर पटेल यानेच नई जिंदगी चौकात शकिल पटेल याचा खून केल्याचे ठामपणे नमूद केले आणि त्यास जन्मठेपेसह दंडाची शिक्षा सुनावली.

## भरधाव डंपर कारवर कोसळला; एकाच कुटुंबातील ७ जणांचा अंत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : खडी वाहून नेणाऱ्या भरधाव डंपरचा ताबा सुटून थेट कारवर कोसळल्याने झालेल्या भयावह अपघातात चार वर्षांच्या मुलासह सात जणांचा मृत्यू झाला. डंपरमध्ये खडी भरलेली होती. वेग जास्त असल्याने डंपरचा ताबा सुटला आणि थेट कारवर कोसळला. खडी कारवर पडल्याने कार अगदी दोन फुटापर्यंत चक्काचूर झाली. संपूर्ण कार डंपर आणि खडीखाली चिरडली गेली. ५ फूट लांबीची कार फक्त दोन फूट राहिली होती. तीन क्रेनच्या मदतीने डंपर बाजूला काढण्यात आला. खडी काढण्यासाठी काही तास लागले. काल २८ नोव्हेंबर रोजी सकाळी, अपघातग्रस्त कुटुंब त्याच्या काकांच्या अंत्यसंस्काराला जात होते. कारमध्ये सात लोक होते. महेंद्र यांची पत्नी राणी (५०), मुलगा संदीप (२४), मोठी बहीण जूली (२४), जूलीचा मुलगा अनिरुद्ध (४), महेंद्रचा जावई शेखर (२८), मेहुणीचा मुलगा विपिन (२०) आणि मेहुणा उमेश सैनी अशी मृत पडलेल्यांची नावे आहेत.

उत्तर प्रदेशातील हे कुटुंब सय्यद माजरा गावातून सहारनपूरमधील गंगोह येथे अंत्यसंस्कारासाठी जात होते. एकाच कुटुंबातील सात सदस्य कारमध्ये होते. अपघातानंतर डंपर चालक घटनास्थळावरून पळून गेला. पोलिस अधीक्षक (शहर) व्योम बिंदल यांनी सांगितले की कारमधून सात मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्यांना शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. गगलहेडी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहारनपूरमधील सय्यद माजरा गावातील एक कुटुंब शुक्रवारी सकाळी ९:१५ वाजता दिल्ली-डेहराडून एक्सप्रेसवेवर कारमधून निघाले. कार गावाबाहेर एक्सप्रेसवेवर पोहाेचलीच होती तेव्हा डेहराडूनहून येणारा भरधाव डंपर उलटला.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की कार अचानक डंपरसमोर आली. डंपर चालकाने ब्रेक लावला, परंतु वेग जास्त असल्याने तो नियंत्रण ठेवू शकला नाही. अनियंत्रित डंपर कारवर उलटला. अपघात इतका भीषण होता की कार पूर्णपणे चिरडली गेली आणि कुटुंब आत अडकले. संदीप आणि त्याची आई राणी यांच्यावर शुक्रवारी सय्यद माजरा गावात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुलगी जूली, जावई शेखर आणि मुलगा अनिरुद्ध यांच्यावर हरिद्वारमधील चांगा मछली भगवानपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. महेंद्र यांच्या मोठ्या मुलाचे सासरे उमेश यांच्यावर हरिद्वारमधील रावली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. महेंद्र यांच्या मेहुण्यांचा मुलगा विपिन यांच्यावर दौलतपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

गावचे सरपंच म्हणाले, मी माझी गाडी महामार्गाच्या कडेला घेऊन उभा होतो. डंपरमध्ये खडी अधिक भरली होती आणि १०० किमी/तास पेक्षा जास्त वेगाने जात होता. चालकाने वेगाने वळताच त्याचे नियंत्रण सुटले आणि तो कारवर उलटला. चालकही मद्यधुंद अवस्थेत होता. अनेक क्रेनच्या मदतीने डंपर बाहेर काढण्यात आला. एक तासानंतर सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले. संदीपला बाहेर काढले तेव्हा तो श्वास घेत होता. रुग्णालयात पोहोचल्यानंतर त्याचा मृत्यू झाला.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक



प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल



नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

# ‘नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता’ चित्रकला स्पर्धेचा पुरस्कार समारंभ संपन्न

## सेवा पर्वातील ऐतिहासिक स्पर्धा : सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बृहन्मुंबई महापालिकेने घेतलेल्या ‘नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता’ या सेवा पर्वातील चित्रकला स्पर्धा ऐतिहासिक असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले. सांस्कृतिक कार्य विभाग, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आणि बृहन्मुंबई महानगर पालिका यांच्या संयुक्त सहकार्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी (१७ सप्टेंबर २०२५) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर २०२५) आयोजित सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत ‘नवा भारत : सांस्कृतिक महासत्ता’ या विषयावर घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाचा आज पु. ल. देशपांडे कला अकादमी येथे उत्साहात संपन्न झाला. त्यावेळी मंत्री शेलार बोलत होते.

यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण उपायुक्त प्राची जांभेकर, कला अकादमीच्या संचालिका मिनल जोगळेकर, गुरु-चरणसिंह सिंधु निर्मिती प्रतिष्ठानच्या सुजात खरे, तसेच विविध शिक्षणाधिकारी आणि समिती सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मंत्री आशीष शेलार म्हणाले, मुलांनी आत्मविश्वासाने सादर केलेले कार्यक्रम पाहून आनंद झाला. पुढील पिढी अशीच पुढे गेली तर भारत विश्वगुरू होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पर्व साजरा करण्याचा निर्णय घेतला असून लोकसहभाग वाढवण्यासाठी अनेक उपक्रम राबवले जात आहेत. १४ कोटी कागदपत्रांचे डिजिटायजेशन, ऐतिहासिक कागदपत्रांचे प्रदर्शन, हेरिटेज वास्तूंची पुस्तके, राज्यातील ७५ वाद्यांचे प्रदर्शन हे उपक्रम म्हणजे सांस्कृतिक संवर्धनाची नवी दिशा आहे.

ते पुढे म्हणाले, लहान मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून सेवापर्वातील ही सर्वात मोठी स्पर्धा ठरली आहे. चित्रकला स्पर्धेने इतिहास घडवला. मुलांमधील कला गुण शोधून त्यांना वाव देणे ही खरी लोकशाही आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान कार्याचा गौरव करीत मंत्री शेलार म्हणाले की, भारताचा सांस्कृतिक वारसा भव्य आणि अद्वितीय आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी या वारशाचे विशेषत्व जपण्याचे आणि जगासमोर मांडण्याचे काम केले. अशा स्पर्धांमधून आदर्श व्यक्तिमत्त्वे घडणार आहेत.

४०० शाळांमधील तब्बल ७५ हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला, तर ८० परीक्षकांनी दोन दिवस परिक्षणाचे काम पार पाडले. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक विजेत्या




विद्यार्थ्यांची नावे, शाळा आणि कला शिक्षकांची नावे समारंभात जाहीर करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कलाकृतींचे कौतुक करतानाच उप-स्थित सर्व मान्यवरांनी भविष्यातील अशा स्पर्धांना आणखी मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पु. ल. देशपांडे कला अकादमीच्या संचालिका मिनल जोगळेकर यांनी केले.


---

# मालेगाव अत्याचार प्रकरणी विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना घडली आहे. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण गावा-वर शोककळा पसरली आहे. दरम्यान, या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रातूनसंताप व्यक्त होताना दिसत आहे. अनेक ठिकाणी आंदोलने झाली आहेत. दरम्यान, या प्रकरणी गृह विभागाकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकरणात विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्राला हादरवलेल्या डोंगराळे येथील तीन वर्षांच्या चिमुकलीवरील झालेला अत्याचार व खून प्रकरणातील आरोपीवर कारवाई अधिक काटेकोर व्ह-ावी म्हणून महाराष्ट्र शासनाने कडक पाऊल उचलले आहे. राज्य सरकारने सुप्रसिद्ध विशेष सरकारी अभियोक्ता अधिवक्ता उज्ज्वल निकम यांची या प्रकरणासाठी निवड केली आहे. मालेगाव न्यायालयात सुरु असलेल्या उ.ठ. क्रमांक ८३९/२०२५ या प्रकरणाची सुनावणी मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, मालेगाव येथे सध्या सुरु आहे. या सुनावणीमध्ये ते विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहणार आहेत. राज्य सरकारच्या कायदा व न्याय विभागाकडून आज अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे.



मालेगाव तालुक्यातील डोंगराळे, गा-वतील ३ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिचा खून केल्यानं खळबळ उडाली होती. चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्याला फाशीच्या शिक्षेच्या मागणीसाठी मालेगाव तालुक्यात आंदोलनं होत आहेत. या प्रकरणी विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर आज गृह विभागाकडून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याची हाद-रवून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. १६ नोव्हेंबर रोजी गावातील २४ वर्षीय विजय संजय खैरनर याने या चिमुरडीवर प्रथम अत्याचार केला आणि नंतर तिचे डोके दगडाने ठेचून अमानुषपणे हत्या केली होती. घटनेची माहिती मिळताच मालेगाव तालुका पोलीसांनी विजय खैरनार याला ताब्यात घेतले होते. या घटनेनंतर माहाराष्ट्रातून संताप व्यक्त होत आहे.

नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथे तीन वर्षीय चिमुकलीवर झालेल्या अत्याचार व हत्येच्या भयंकर घटनेने सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या अमानुष कृत्याच्या निषेधार्थ ठिकठिकाणी मूक मोर्चा काढले होते. मार्चे काढून निषेध व्यक्त करण्यात आला होता. आरोपीवर तातडीने फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून कठोरातील कठोर अशी फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात येत आहे. यापुढील काळात या प्रकरणाच्या तपास प्रक्रियेत आवश्यक समन्वय, कायदेविषयक मार्गदर्शन, पुनर्वसनासंदर्भातील सहाय्य, तसेच पीडित कुटुंबाच्या रक्षण आणि हिताविषयीच्या सर्व आवश्यक उपाययोजना करणार असल्याचे अनेक राजकीय नेत्यांनी सांगितले आहे.

---

# राजू शेट्टींसह ८० जणांची कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयाकडून ३०२ प्रकरणात निर्दोष मुक्तता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोली येथे २०११ साली झालेल्या ऊस आंदोलनातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खा-सदार राजू शेट्टी यांच्यासह ८० जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. कोल्हापूर सत्र न्यायालयात न्यायाधीश श्री. कश्यप यांच्या कोर्टात झालेल्या सुनावणीनंतर सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. १६ वर्षानंतर हा निकाल लागल्याने आंदोलनातील शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या आवारातच एकमेकाला गळाभेट घेत आनंद व्यक्त केला.

यावेळी बोलताना राजू शेट्टी म्हणाले की शेतकरी आंदोलने करत असताना आंदोलन दडपण्यासाठी तत्कालीन राज्य सरकारने पोलिस प्रशासनास हाताशी धरून जाणीवपूर्वक हा गुन्हा दाखल केलेला होता. या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता झाल्याने चळवळीमध्ये लढण्यासाठी कार्यकर्त्यांना पुन्हा बारा हत्तीचे बळ आले आहे. शेतकरी हा न्याय हक्कासाठी व घामाच्या दामासाठी संघर्ष करत होता आणि तो यापुढेही लढतच राहणार असल्याची भावना राजू शेट्टी यांनी व्यक्त केली.

शिरोलीत झालेल्या घटनेनंतर सुरवातीस वडगांव न्यायालयात कामकाज चालले. त्यानंतर जिल्हा सत्र न्यायालयाकडे सदर प्रकरण वर्ग करण्यात आले. गेली १५ वर्षे या आंदोलनातील आरोपी असलेले सर्व शेतकरी कार्यकर्ते न्यायालयाच्या पायऱ्या झिजवत होते.

प्रदीर्घ वर्षानंतर सर्व आंदोलकांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. सदर प्रकरणी ड.ब्रिजेश शास्त्री, ॲड. श्रेणिक पाटील, ॲड. अमेय मकरे, ॲड. सुवर्णभद्र पाटील, ॲड. टी वाय जाधव, ॲड. प्रिती चिटणीस, ॲड. ऋषिकेश काकडे, ॲड. ऋषिकेश शास्त्री, ॲड. व्ही व्ही डोईजड यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

---

# तेलंगणाहून निघालेले दाम्पत्य बेपत्ता, विहिरीत आढळली कार; ग्रामस्थांची गर्दी

(पान १ वरून..) आढळून आले आहेत.

जळगाव जिल्ह्यातील पद्मसिंह दामू पाटील हे तेलंगणा राज्यातील सीतापुरम येथील एका खाजगी सिमेंट कंपनीमध्ये कार्यरत आहेत. ते व त्यांची पत्नी नम्रता हे त्यांच्या स्वतःच्या कार क्रमांक एम एच १३ बी एन ८५८३ ने जळगाव खा-न्देश जिल्ह्यातील पाचोरा येथे लग्न सोहळ्याला जाण्यासाठी निघाले होते. त्यांचं शेवटचं मोबाईल लोकेशन हे बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान महामार्गावर असलेल्या वडनेर गावाजवळ आढळून आलं आहे. मात्र, त्यानंतर हे दाम्पत्य रहस्यमयरित्या बेपत्ता झाल्याची तक्रार दांपत्याच्या नातेवाईकांनी नांदुरा पोलिसात दाखल केली. त्यानुसार, पोलिसांचे पथक या दांपत्यांच्या शोधासाठी रवाना झाले असतानाच परिसरातील एका विहिरीत कार आढळून आली आहे. अचानक बेपत्ता झालेल्या दांपत्याच्या घटनेमागे घातपाताचा संशय ही व्यक्त होत आहे.

वडनेर भोलजी नजीक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ च्या बाजूला एका विहिरीत पांढऱ्या रंगाची एक कार आढळून आली असून ही कार पाटील दांपत्याची असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनास्थळी नुकतेच पोलीस पोहोचले असून परिसरातील ग्रामस्थांनीही गर्दी केली आहे. सध्या विहिरीतून कार बाहेर काढण्याचं काम सुरू आहे. परवा गुरुवार सायंकाळी पाटील दांपत्य तेलंगणाहून जळगावकडे जात असताना अचानक हे दाम्पत्य बेपत्ता झाले होते. त्यानंतर, पोलिसांनी गेल्या २४ तासापासून पोलिसांनी युद्ध पातळीवर शोध मोहीम राबवली होती. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने ती कार बाहेर काढली असता आतमध्ये दोघांचेही मृतदेह आढळल्याने सर्वांना धक्का बसला. हा अपघात आहे की घातपात? याची पुढील चौकशी आता पोलीस करत आहेत.




# वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये फनफेअर; आनंद, उत्साह आणि बालशक्तीचा उत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल, निफाड येथे. भव्य फनफेअरचे आयोजन करण्यात आले. सकाळी ११ वाजता फनफेअरचे उद्घाटन मान्यवरांच्या करण्यात आले असून परिसरात रंगीबेरंगी सजावट, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध फूड स्टॉल्स, खेळ, हस्तकला वस्तू, वैज्ञानिक खेळणी, अशा कल्पक स्टॉल्सची मांडणी केली. प्रत्येक स्टॉलमध्ये विद्यार्थ्यांची कल्पकता, नेतृत्वगुण आणि टीमवर्क स्पष्ट दिसून आले. फक्त २० रुपयांपर्यंत वस्तू ठेवण्याच्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी आर्थिक शिस्त व जबाबदारीचेही उत्तम प्रदर्शन केले. यावेळी इयत्ता ४थी ते इयत्ता ९वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून पालकांनीही या उपक्रमात पाल्यास सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले विविध स्टॉल्सला भेट देत विद्यार्थ्यांच्या क्रियात्मक कौशल्याचे कौतुक केले. शाळेचे ट्रस्टी, संचालक, प्राचार्य व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केले अभिनंदन केले. फनफेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संघभावना, व्यवहारज्ञान, संवादकौशल्य आणि सर्जनशीलता यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला मिळाला असून कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला

---

# बलवान गोतसुर्वे यांच्या पक्षनिष्ठ व संघटनात्मक कार्यामुळे वळसंग पंचायत समिती गणामध्ये त्यांना संधी नक्की मिळणार.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बलवान गोतसुर्वे हे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे खंदे समर्थक व निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांच्या पक्षकार्याची दखल आणि त्यांच्या संघटनात्मक कार्याची दखल म्हणून भारतीय जनता पार्टीच्या वतीने पक्षाचे अनु जाती जिल्हासरचिटणीस बलवान गोतसुर्वे यांना अनुसूचित जाती साठी राखीव झालेल्या वळसंग पंचायत समिती गणातून उमेदवारी पक्की असून आणि विजय ही नक्की असल्याची खात्री वळसंग गणात येणाऱ्या सर्व गावातील सर्व भाजप प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांना वाटते आहे.

१ डिसेंबर हा बलवान गोतसुर्वे यांचा वाढदिवस. लहान पणापासून सामाजिक कार्याची आवड असलेले बलवान गोतसुर्वे अनेक लोकपयोगी व नावीन्यपूर्ण कार्य करण्याचा त्यांचा हातकंडा आहे. वडील कालकथित लक्ष्मणराव गोतसुर्वे हे २००२ साली जिल्हापरिषद सदस्य झाले. आजोबा कालकथित आप्पराव गोतसुर्वे हे वारकरी सांप्रदायातील पुढे जाऊन ते मुंबई येथे आ-पला कन्ट्रक्शन चा व्यवसाय सुरू केला त्या माध्यमातून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आचेगांवच्या पंचक्रोशीतील अनेक गावातील बेरोजगारांना रोजगाराचे संधी उपलब्ध करून दिली त्याचबरोबर अनेक दिवस त्याने शाळा व सामाजिक कार्यासाठी आर्थिक मदत करीत आल्याने त्यांची ओळख ही एक दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून या भागात परिचित झाले होते. तोच समाज सेवेचा वारसा बलवान गोतसुर्वे हे पुढे घेऊन जात आहेत. शांत, प्रामाणिक, व स्वयंमी स्वभाव असलेले बलवान गोतसुर्वे सामाजिक कार्याच्या बळावर २००७ साली पहिल्यांदा ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले त्यानंतर उपसरपंच व काही कालावधीसाठी गावचे सरपंच पद ही भूषवले. आपल्या कालावधीत गा-वात बंदिस्त गटार, सिमेंट रस्ते, वाड्या वस्त्या वर हातपंप बसवले हा एक विक्रमच होता. रोजगार हमी योजने अंतर्गत जिल्ह्यात सर्वप्रथम गावात रोजगार हमीचे कामे सुरु केली याची दखल घेऊन पंचायत समिती दक्षिण सोलापूरच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.त्यांच्या अश्या कुशल कामाचा सपाटा अजून चालू असून त्या जोरावर सध्या त्यांच्या सुविध्य पत्नी आचेगांव ग्राम पंचायत च्या बिनविरोध सदस्य आहेत.

आज अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे जिल्ह्यात वाढलेल्या प्रस्थामुळे भाजप प्रवेशाची मोठी लाट दिसून येत आहे. पण जेंव्हा सचिन दादा आमदार नव्हते त्यावेळी बलवान गोतसुर्वे यांनी एक मावळा बनून सचिन दादा सोबत राहिले व २०१७ साली काँग्रेस बालेकिल्ला म्हणून परिचित असलेल्या वळसंग जिल्हापरिषद गटात सचिन दादांच्या शब्दाखातर निवडणुक लढवली यात त्यांचा अगदी थोडक्यात पराभव झाला. हा पराभव भाजप कार्यकर्ते व जनते सोबत त्यावेळी भाजप तालुकाध्यक्ष असलेल्या सचिन दादांना देखील जिव्हारी लागला होता. आणि तेंव्हाच तालुकाअध्यक्ष



असलेल्या सचिन दादांनी हा पराभव आपण नक्की भरून काढू असे सांगितले. पराभव झाला तरी बलवान गोतसुर्वे खचून न जाता मोठया जोमाने पक्षकार्यात व जनसेवेत स्वतःला झोकून दिले. वैयक्तिक लाभाच्या योजना, निराधार योजना त्याच बरोबर प्रत्येक गावातील अनेक समस्या जाणून घेऊन सोडवण्याचा प्रयत्न करीत राहिले. वळसंग भागात पुढे येऊन पक्षाचे ध्येय धोरण व पक्षबांधणीचे व बूथ सक्षमीकरण करणे आदी कार्य करण्यासाठी सचिन दादांनी बलवान गोतसुर्वे यांच्यावर जबाबदारी दिली. ती जबाबदारी ही संधी मानून बलवान गोतसुर्वे सचिन दादांनी दिलेल्या जबाबदारीचे पालन करीत प्रत्येक गांव पिंजून काढला. गणातील प्रत्येक गा-वातील प्रत्येक बूथवर कार्यक्रम घेत वळसंग गणातील सर्व बूथवर 'मेरा बूथ सबसे मजबूत' हा उपक्रम यशस्वीपणे राबवत सचिन दादांच्या विश्वासास पात्र ठरले.

२०१९ विधानसभा निवडणुकीत सचिन दादा हे त्यांनी निर्माण केलेल्या एक एक अनमोल कार्यकर्त्याच्या जोरा-वरती मोठया मताधिक्याने निवडून येऊन आमदार झाले. त्यानंतर ही आमदार सचिन दादांनी जी जी जबाबदारी बलवान गोतसुर्वे यांना दिली ती त्यांनी अगदी यशस्वी पणे पार पाडली. आज सचिन दादा दोन वेळा मोठया मताधिक्याने निवडून आले आणि त्यानंतर अनेक सहकारी संस्थावर वर्चस्व निर्माण करून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे निकटवर्तीय बनून जिल्ह्याच्या राजकारणातील चाणक्य बनले आहेत. त्यामुळे जिल्ह्यासह अक्कलकोट मतदारसंघात ही भाजप प्रवेशासाठी रस्सीखेच लागली आहे त्यात काही जण तर काय तरी संधी मिळेल म्हणून प्रवेश करीत आहेत. त्यातच सध्या काही जण जिल्हापरिषद पंचायत समिती निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन संधी मिळाली तरच प्रवेश अशी ही भूमिका घेऊन सचिन दादांच्या अवती भोवती त्यांच्या नजरेत येण्यासाठी अनेक प्रकारे धडपडत आहेत.पण त्यांना एक गोष्ट माहित असावी जेंव्हा सचिन दादा आमदार नव्हते त्यावेळी त्यांचे अनेक शिलेदार आपले राजकीय भविष्य दावणीला बांधून सचिन दादांच्या तंबूत सामील झाले होते आणि त्यावेळी सचिन दादांच्या 'आता नाहीतर कधी नाही' या अभियानात बलवान गोतसुर्वे हे पण आग्रस्थानी होते. आणि आज ही प्रत्येक गोष्टीत बलवान गोतसुर्वे मोठया हिरारीने आणि जबाबदारीपूर्वक सामील असतात.

लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांची भूमिका स्पष्ट असते निष्ठावंताचा विचार सर्वप्रथम व पडत्या काळात सोबत असणाऱ्यावर कसल्याही परस्थितीत अन्याय होऊ नये याची काळजी ते नेहमच घेत असतात यासाठी त्यांना कसली ही किंमत मोजावी लागली तरी त्याची पर्वा आमदार सचिन दादा हे करीत नसतात.

आमदार सचिन दादा यांचे अत्यंत विश्वासू म्हणून परिचित असलेले व पक्षकार्यात हिरारीने भाग घेणारे सचिन दादांचा शब्द प्रमाण म्हणून काम करणारे बलवान गोतसुर्वे यांना डउ राखीव झालेल्या वळसंग पंचायत समिती गणात संधी नक्की असणार असून बलवान गोतसुर्वे यांची अशीच मोठमोठया पदावर वर्णी लागून प्रगती व्हावी व आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा विश्वास कायम सार्थ करण्याची क्षमता चिरंतन राहो हीच त्यांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा.

**– महिबूब पटेल आचेगांव**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक; पोलीस प्रशासन यंत्रणा सज्ज

## ३४५ पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती; निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शस्त्र परवानाधारकांकडून ३६ शस्त्रे जमा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने पंढरपूर शहर व परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस ,प्रशासन सज्ज असून, निवडणूक प्रक्रिया शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी ३४५ अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी केले आहे.

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी व पंढरपूर शहरात कायदा व सुव्यवस्थेसाठी १५ पोलीस अधिकारी, २१० पोलिस अमंलदार व १२६ होमगार्ड तसेच एक एसआरपीएफ पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

पोलिस प्रशासनाने गुन्हेगारी पार्श्र्वभूमी असलेल्या ११२ जणांना पोलीसांनी तडीपार करण्याबाबतचे प्रस्ताव पाठवले आहेत .त्याचप्रमाणे संरक्षणासाठी दिलेल्या शस्त्रांचा गैरवापर होऊ नये, यासाठी शहरातील शस्त्र परवाना धारकांकडून ३६ शस्त्रे जमा करण्यात आली आहेत. तसेच उपविभागात विविध गुन्हे दाखल असलेल्या ९ सराईत गुन्हेगारावर एमपीडीएअंतर्गत स्थानबद्ध करत कारवाई करण्यात आली असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.डगळे यांनी सांगितले.

पोलीस प्रशासनाकडून मतदान केंद्राची रचना, सीसीटीव्ही नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन तसेच निवडणूक पूर्व व निवडणुकीनंतर ईव्हीएम मशीनच्या सुरक्षेसाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था पोलीस प्रशासनाकडून करण्यात आली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक श्री घोडके यांनी दिली.त्याशिवाय नाकाबंदीत संशयीत वाहनांची झडाझडती घेण्यासह, फिरत्या पथकांमार्फत देखिल गैरकृत्यांवर नजर ठेवून दोषींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# पंढरपूर नगरपालिका भाजपचे उमेदवार शामल शिरसाट यांना महिलांचा पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका २०२५ च्या नगराध्यक्ष पदाच्या भाजप पक्षाच्या अधिकृत उमेदवार सौ शामल शिरसाठ यांना महिलांमधून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.





पंढरपूरच्या राजकारणात माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी जातीपातीचे राजकारण न करता सर्व जातीसमूहातील प्रतिनिधित्व देण्याचे काम केले आहे. त्या निवडणुकीतील जातीच्या नाहीतर कामाच्या जोरावर सर्वसामान्य कुटुंबातील शामलताई शिरसाट यांना भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आले आहे. तर दुसरीकडे काँग्रेस प्रणित तीर्थक्षेत्र विकास आघाडीतून पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे काँग्रेसचे उमेदवार बघीत भालके यांच्या पत्नी डॉ. सौ प्रणिती भालके यांच्या माध्यमातून नेत्यांच्या घरातीलच उमेदवार लढण्यास असल्याने त्यांना कार्यकर्त्यांमधून.

लोकसभा विधानसभेतील राज्यभरात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यासाठीच्या निवडणुका म्हणून पाहिले जाते मात्र पंढरपूर नगरपालिका निवडणूक विधानसभेसाठी असणाऱ्या नेत्याचीच आपल्या घरातील उमेदवार दिल्याने त्यांच्या गटातील कार्यकर्त्यांनी नारायण दिसत आहे.

भाजपच्या नाराजी पदाच्या उमेदवार सौ शामलताई शिरसाट यांना भोसले कुटुंबा पाठिंबा दिला आहे.

पंढरपूर शहराच्या राजकारणातील मातेब्बर घराणे म्हणून ओळखले जाणारे भोसले कुटुंबातील सदस्य बाह्य उमेदवार शमल ताई शिरसाट यांच्या विजयासाठी महिन्याचा उतरले असून त्यामध्ये दीपक उर्फ गणपतराव वसंतराव भोसले, मुकुंद वसंतराव भोसले, हेमंत वसंतराव भोसले, औदुंबर भोसले शिवतेज भोसले, जयवंत भोसले व डॉक्टर सागर भोसले, विक्रम भोसले प्रसाद भोसले विनायक भोसले रणवीर भोसले कांतीलाल सुपेकर यांनी प्रचाराची धुरा हाती घेतली आहे.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग वनसेवा मुख्य परीक्षा-२०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग वनसेवा मुख्य परीक्षा-२०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीच्या तयारीसाठी एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. १०,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग वनसेवा मुख्य परीक्षा-२०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य द्येयात येते.

सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग वनसेवा मुख्य परिक्षा २०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत. पात्र असलेल्या उमेदवारांना एकरक्कमी रक्कम रु. १०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in NOTICEBORDMaharashtra Public Service Commission Forest Service Main Examination-2024 येथे भेट द्यावी.

# कबड्डी कबड्डी... अरे भाऊ उचल...



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क** : जय सेवा क्रीडा मंडळ बोळदे आयोजित डे नाईट कबड्डीचा अंतिम सामना उत्कृष्ट खेळ करताना खेळाडू व हा सामना पाहण्यासाठी गावातील नागरिक अतिशय उत्साही झाले.
– छायाचित्र मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी

# कबड्डी हा चपळता व कौशल्य या गुणांचा खेळ आहे

## खेमचंद रंगारी यांचे प्रतिपादन : बोळदे येथे बक्षीस वितरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : कला कौशल्य क्रीडा या सर्व गोष्टी खेळाच्या अनुषंगाने महत्वाचे आहे. कौशल्य व चपळता याशिवाय कबड्डी हा खेळ पूर्ण होऊ शकत नाही. कारण कबड्डी हा सांघिक सहकार्य चपळता या गुणांची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व सेवानिवृत्त शिक्षक खेमचंद रंगारी यांनी केले. ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

यावेळी बक्षीस वितरण करताना गावातील पोलीस पाटील रंजना राऊत, ग्रा. म. सदस्य मनीषा शहारे, धम्मदीप मेश्राम, दादाजी किरसान, वामन राऊत, घनश्याम राऊत, निलकंठ किरसान, ईश्वर प्रधान व सहादेव चनाप आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

जयसेवा क्रीडा मंडळ बोळदे कवठा येथे डे-नाईट कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सिलेझरी संघाने प्रथम बक्षीस प्राप्त केला आहे. दुसरा नवेगावबांध, तिसरे मगरडोह तर चवथे बोळदे यांनी मिळविले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ज्ञानू प्रधान यांनी केले. तर मंडळाच्या सभासदांनी सहकार्य केले.

## विक्रमशील बुद्ध विहारात भारताचे संविधान दिन उत्साहात संपन्न

# लोकशाही हा भारताचे संविधानाचा प्राणवायू आहे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : : शहरातील शंभू नगर येथील विक्रमशील बुद्ध विहारात भारताचे संविधान दिनाच्या अनुषंगाने २६ नोव्हेंबर २०२५ ला प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकरांईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधानात मानवीय दृष्टिकोनातून सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध कलम द्वारे अनेक तरतुदी करून ठेवलेल्या आहेत. ज्यात जात, धर्म, वंश, लिंग, परंपरा, प्रांत, भाषा इत्यादी बाबी वरून भेदभाव पाळता येणार नाही. तसेच सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय प्रदान केलेले आहे. भारताच्या संविधानाविषयी व्यक्त होत असताना केवळ 'संविधान', 'सविधान' असे एकेरी बोलून चालणार नाही तर भारताचे संविधान असे स्पष्ट म्हटले पाहिजे. तशी तरतूद कलम ३९३ मध्ये केलेली आहे. ज्यामुळे भारतापासून संविधान वेगळे करता येणार नाही. तसे कोणी केले तर ते कुठल्या संविधानाविषयी बोलत आहेत, याचा अर्थ बोध होणार नाही. परिणामी समाज जीवनात चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे. याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती म्हणून त्यांनी यासाठी स्वतंत्र एक कलम लिहून तशी तरतूद केलेली आहे.



भारताचे संविधान हे सामाजिक क्रांतीचे वाहन आहे. याची परिपूर्ण अंमलबजावणी केली तर समाज जीवनात जलद गतीने अमुलाग्र क्रांतिकारक बदल होण्याची दाट शक्यता आहे. ज्यातून वैश्विक बंधुत्व विकसित होऊ शकेल. करिता याची मार्मिकता मानवीय मनात प्रतिबिंबित करण्यासाठी संबंधित विचाराच्या अनुषंगाने मनाची मशागत केली पाहिजे. ज्या संविधानावर संपूर्ण देश चालतो ते भारताचे संविधान देशातील बहुतांश नागरिकांना माहीत नसावे. यापेक्षा मोठी शोकांतिका काय असू शकेल? लोकशाही हा भारताचे संविधानाचा प्राणवायू आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या लॉ लायब्ररीत दिलेल्या संदेशात संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटी आणि शर्तीचे मार्गदर्शन केले आहे. त्याचे आपण अनुसरण केले पाहिजे. करिता राज्यकर्त्यांनी देशातील सर्व नागरिकांना याची परिपूर्ण जाणीव व्हावी म्हणून स्वतंत्र उपाय योजना राबवून संबंधित मूल्यांचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. जेणेकरून या देशातील सर्व नागरिक भारताचे संविधान अबाधित ठेवण्यासाठी आपली भूमिका नीट पार पाडू शकतील.

कार्यक्रमाची सुरुवातीला पंचशील, त्रिशरण व बुद्ध वंदना घेण्यात आली. आदर्शांना पुष्प व पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करण्यात आल्या. याप्रसंगी अनामी मोरे, पांडुरंग वाकळे यांनी ही मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून भारताचे संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला पत्रकार सुजित ताजणे, आकाश भदर्गे, आकाश जाधव, गणेश म्हस्के, कुमार वाघमारे, प्रशांत जाधव, नितीन चाबुकस्वार इत्यादी.

# होम टू होम संवाद ; जिल्हाध्यक्षांच्या प्रचाराला मिळतोय उस्फूर्तपणे प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार यंत्रणा झपाट्याने कामाला लागले आहे. प्रभाग क्रमांक ११ मध्ये पत्नी सौ सुजाता ताई चेतन सिंह केदा यांच्या प्रचारासाठी त्यांची पती भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह उर्फ बाळासाहेब केदार सावंत मैदानात उतरलेले आहेत. घर टू घर स्वतः फिरून शहर विकास आघाडीला दोन तारखेला मतदान करून विजयी करण्याचे आव्हान करीत प्रचार करीत असताना संवादाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

नवे पर्व नवा विकास घेऊन सांगोला नगरपरिषदेच्या डोळ्यासमोर ठेवून भारतीय जनता पार्टी व शेतकरी कामगार पक्ष व दीपक आबा साळुंखे पाटील गट यांनी सांगोला शहर विकास आघाडीच्या माध्यमातून आपले उमेदवार उभे केले आहेत. यामध्ये शहर विकास आघाडीचे नगराधिक पदाची उमेदवार मारुती आबा बनकर यांच्यासह प्रभाग ११ मध्ये भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार यांच्या पत्नी सौ सुजाताई चेतन सिंह केदार व प्रभाग ११ ब मधू सौ इंदुमती अशोक चव्हाण प्रभाग ११ क्र मध्ये भाजपचे युवक नेते डॉक्टर परेश खंडागळे यांचे बंधू उन्मेश लक्ष्मणराव खंडागळे हे निवडणूक रिंगणात उभे असून या उमेदवाराच्या प्रचारार्थ डॉक्टर बाबासाहेब देशमुख माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे.

प्रभाग ११ मधून शहर विकास आघाडीचे उमेदवारांना भरघोस प्रतिसाद मिळत आहे.


प्रभाग ११ मधून मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी रस्ते गटारी, पथदिवे, शिक्षण आरोग्य, शौचालय यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या सौभागातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी टोकाचा भाग ११ नंबर प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शहर विकास आघाडी करण्यासाठी कटिबद्ध आहे विश्वास व्यक्त करीत तळागातील लोकांना न्याय मिळावा सर विकास आघाडी उमेदवाराकडून देण्यात आला आहे.

येत्या निवडणुकीमध्ये शहर विकास आघाडीच्या उमेदवारांना विजय करावी असे आव्हान भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार यांनी केले आहे

सांगोला नगरपालिका निवडणूक २०२५ च्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार मारुती बनकर, प्रभाग ११ चे शहर विकास आघाडीचे उमेदवार सौ सुजाताई चेतन सिंह केदार, सौ इंदुमती अशोक चव्हाण, व उन्मेश लक्ष्मणराव खंडागळे या उमेदवाराच्या प्रचारात महिलांनी मोठ्या आघाडी घेतली आहे हळदी कुंकू कार्यक्रम घर टू घर घेऊन राबवली जात आहे महिलांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

# शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना शिक्षित, दीक्षित आणि योग्य नागरिक बनवावे

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे प्रतिपादन; राज्यपाल पदाचा पदभार स्विकारल्याबद्दल उलवे येथे सत्कार समारंभ संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
रायगड-अलिबाग (जिमाका) : आधुनिक काळात शिक्षकांना विद्यार्थी घडवणे आव्हानात्मक झाले आहे. आजची मुले स्मार्ट आहे त्यामुळे त्यांना शिकवताना शिक्षकांना अधिक स्मार्टनेस दाखवावा लागेल. मुलांना रागावण्याचे किंवा अपमानित करण्याचे युग गेले आहे, असे सांगताना शैक्षणिक संस्थांनी शिक्षित, दीक्षित आणि उत्तम नागरिक घडवावे, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

राज्यपाल देवव्रत यांचा आज देशभरातील डीएव्ही महाविद्यालय शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल उलवे येथील भूमिपुत्र सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यपाल देवव्रत हे डीएव्ही संस्थेचे माजी विद्यार्थी असून ते कुरुक्षेत्र हरियाणा येथे निवासी गुरुकुल चालवतात.

आजच्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना माहिती मिळत आहे, परंतु जीवनाचे उद्दिष्ट सांगितले जात नाही. त्यामुळे शिक्षण संस्थांमधून अपूर्ण व्यक्तिमत्त्व निर्माण होत आ-हेत, असे राज्यपालांनी सांगितले.

लहान मुले शिक्षकांचे आचरण विचरण पाहत असतात, त्यामुळे शिक्षकांनी आपल्या आचरणातून मुलांपुढे आदर्श ठेवावेत तसेच मुलांना भारतीय जीवन मूल्यांशी जोडावे असे राज्यपालांनी सांगितले. आपण कुरुक्षेत्र येथे अवघ्या सात मुलांना घेऊन गुरुकुल सुरु केले. आज मात्र तेथे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून हे गुरुकुल पाहण्यासाठी देशभरातून लोक येतात, असे राज्यपालांनी सांगितले.

डीएव्ही संस्थेच्या वतीने झालेला सत्कार हा आपल्याच कुटुंबाकडून झालेला सत्कार आहे, असे सांगताना आपल्या जडणघडणीत महर्षी दयानंद, आर्य समाज व डीएव्ही संस्थेचे मोठे योगदान आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

शैक्षणिक क्षेत्रात डीएव्ही संस्थांनी जितके व्यापक योगदान दिले आहे तितके क्वचितच इतर संस्थांनी दिले आहे असे राज्यपालांनी सांगितले.

सत्कार सोहळ्याला डीएव्ही कॉलेज व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पूनम सूरी, मानद सचिव अजय सुरी, उपाध्यक्ष एस के सोपोरी, प्रबोध महाजन, अनिल कुमार राव, संचालिका डॉ. निशा पेशीन, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, संस्थांच्या शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृती दिना निमित्त अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
रेणापूर: प्रतिनीधी, सुधाकर रणदिवे, रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले या वेळेस क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .

या वेळी डी. एल एड बी एड छात्र अध्यापकांनी मनोगत व्यक्त केले.प्रा रमाकांत गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.प्रमुख पाहुणे म्हणून रेणुका अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य रतन लहाने यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य उमेश रणदिवे यांनी केला.यावेळी राधिका माने मॅडम, ग्रंथपाल मनिषा लातूरकर योगेश माने, डी एल एड, बी एड छात्र अध्यापक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कौमुदीनी लहाने यांनी केले तर आभार प्रदर्शन कु ज्योती मिसाळ यांनी केले.

## रामेगाव जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुरुड: प्रतिनीधी, सुधाकर रणदिवे,बोरगाव काळे भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंच,माटेफळ यांच्या वतीने लातूर तालुक्यातील रामेगाव जि.प.शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष बापू खोसे यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन रजिस्टर व पेन वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाला संस्थापक अध्यक्ष बापू खोसे, बाळासाहेब खोसे, धनंजय खोसे,नरसिंग खोसे, रामचंद्र हिंगे, राजाभाऊ सोनवणे, नितीन एडके,भैरवनाथ झाडके, रयतेचे स्वराज्य संघटनेचे राज्य संघटक ज्ञानेश्वर काळे,माजी शिक्षण विस्तार अधिकारी व्यंकटराव गंगणे, शाळेचे मुख्याध्यापक गुत्ते, कोळी, सोसायटीचे चेअरमन देशमुख, सरपंच हेमंत मगर, सुफी सय्यद, कांबळे, चव्हाण, स्वप्नील मगर, शिक्षक वृंद,पालक उपस्थित होते. संविधानाच्या ७५ वर्षांच्या पर्वावर विद्यार्थ्यांमध्ये संविधान मूल्यांची जागरुकता निर्माण व्हावी आणि त्यांच्यात शिक्षणाबद्दल सकारात्मकता वाढावी हा उपक्रमाचा उद्देश असल्याचे अध्यक्ष बापू खोसे यांनी यावेळी सांगितले.

## कारकिर्दीच्या यशस्वीतेत टीम वर्क महत्वाचे : मुख्य सचिव राजेश कुमार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई : महाराष्ट्र हा माझ्या रक्तात, स्वभावात आणि आ-चरणात असून कोणत्याही पद-ावर यशस्वी होण्यासाठी माती आणि संस्कृतीशी एकरुप होणे गरजेचे आहे. आपल्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या कारकिर्दीत सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबतचे टीम वर्क महत्त्वाचे ठरल्याची भावना मुख्य सचिव राजेश कुमार यांनी व्यक्त केली.

मुख्य सचिव राजेश कुमार ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांचा सेवापूर्ती समारंभ मंत्रालयात आयोजित करण्यात आला. यावेळी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, आयएएस अधिकारी संघटना यांच्यावतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राजेश कुमार यांच्या पत्नी अर्चना राजेश कुमार, अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव व्ही.राधा यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी भावना व्यक्त करताना मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, मुख्य सचिव पदावर काम करताना आपण सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा प्रयत्न केला. ३७ वर्षांहून अधिक काळ सेवा करताना विविध विभागांमध्ये आणि शहरांमध्ये काम केले. यादरम्यान राज्याच्या कानाकोपऱ्यातील लोकांना भेटण्याचा योग आला असून हीच आपली ताकद आहे. राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याकडे क्षमता आणि अनुभव असून त्यांनी महाराष्ट्र सर्व क्षेत्रांमध्ये अग्रस्थानी नेण्यासाठी एकमेकांना सहकार्य करीत काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मिलिंद म्हैसकर, विकास खारगे, वेणुगोपाल रेड्डी, अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रशासकीय अधिकारी निपूण विनायक, सहसचिव डॉ. श्रीकांत पुलकुंडवार, अवर सचिव विठ्ठल भास्कर आदींनी यावेळी मनोगतात राजेश कुमार यांच्या कारकीर्दीचा गौरव करुन त्यांना शुभेच्छा दिल्या. सहसचिव विजय चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## डॉ. प्रणिती भालके यांची प्रभाग क्रमांक १३, १४ मध्ये पदयात्रेत घर टू घर भेटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका २०२५ नगरपालिका व नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीमध्ये तीर्थक्षेत्र विकास आघाडीची अधिकृत उमेदवार डॉक्टर सौ प्रणितीताई भालके यांच्या प्रचारासाठी प्रभागभ क्रमांक १३, व १४ तीच क्षेत्र विकास समर्थकांची प्रचंड मोठ्या प्रमाणावर गर्दी व प्रत्येक ठिकाणी भालके यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.



नवे पर्व व नवे दिशा घेऊन पंढरपूर नगरपालिकेचा सर्वांगीण विकास डोळ्यासमोर ठेवून तीर्थक्षेत्र विकासा गाडीचे नगराचे पदाचे उमेदवार डॉक्टर व सर्व नगरसेवक यांना भरघोस मताधिक्याने विजयी करावी असे आव्हान तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे उमेदवारांना मतदारसंघाचा भरघोस पाठिंबा मिळत आहे.

शहरातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी रस्ते, गटारी पथदिवे, शिक्षण आरोग्य शौचालय, यासारख्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यासह या भागातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रभाग १३ व १४ या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आघाडी कटिबद्ध आहे. असा विश्वास व्यक्त करत. तळागाळातील लोकांना न्याय मिळावा म्हणून मिळून मिसळून काम करणारी उमेदवार तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे रोहित बार यांना भरघोस मताने विजयी करावे असे आव्हान विकास आघाडीचे पदाधिकाऱ्यांनी केले आहे

## बार्टी व प्रथम यांच्या संयुक्त विद्यमाने ‘संविधान दिन’ साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पुणे : २६ नोव्हेंबर २०२५ ’संविधान दिना’च्या निमित्ताने डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी ) पुणे आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार (चेण) हा दिवस प्रथम संस्थेच्या महाराष्ट्रातील सर्व केंद्रांमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रथम संस्थेच्या राज्यातील सर्व सेंटरमधील विद्यार्थी आणि सेंटर स्टाफ मोठ्या संख्येने उपस्थित होते. साधारणपणे ३५० हून अधिक युवकांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. प्रथम व इठढख यांच्या संयुक्त विद्यमाने वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण महाराष्ट्रातील सर्व सेंटरमध्ये राबविण्यात येत आ-हेत काही सेंटर मध्ये नवीन प्रशिक्षण उपक्रमाचे उद्घाटन याप्रसंगी करण्यात आले आहे.

कार्यक्रमात, संविधानाचे महत्त्व श्रीमती. प्रज्ञा मोहिते ( अधिक्षक, बार्टी, कौशल्य व प्रशिक्षण विभाग ) यांनी केले. त्यांनी युवकांना भारतीय संविधानाचे मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये व मार्गदर्शक तत्वे या विषयी मार्गदर्शन केले.

यावेळी श्री. संजय लोखंडे (प्रथम - प्रोग्राम लीडर) आणि श्री. अनिल कारंडे (बार्टी - विभाग प्रमुख, डेप्युटी कलेक्टर) यांनी युवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानाप्रती निष्ठा आणि त्याचे नागरिक म्हणून असलेले कर्तव्य यावर भर दिला. हा संपूर्ण कार्यक्रम इठढख संस्थेचे महासंचालक श्री. सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला..

या संपूर्ण कार्यक्रमात सर्व युवक आणि स्टाफ यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने व उत्साहाने सहभाग दर्शवला.

**पर्यटन संचालनालयाचा कौतुकास्पद उपक्रम**

**पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची माहिती**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त टूर सर्कीटचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून पर्यटन संचालनालयामार्फत दि. ३ ते ५ डिसेंबर २०२५ रोजी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट’चे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील चैत्यभूमी येथे भेट देणारे पर्यटक तसेच अनुयायींसाठी टूर सर्किट निःशुल्क असणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रेरणादायी महान कार्य, त्यांचे जीवनचरित्र, विचार पर्यटक व नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या टूर सर्कीटचा मुख्य उद्देश आहे. पर्यटकांनी या पर्यटन सर्किटचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यटन सर्किट ही केवळ एक पर्यटन संकल्पना नसून, भारताच्या लोकशाहीचा पाया रचणाऱ्या महामानवाच्या विचारांना अभिवादन आहे. त्यांच्या जीवनातील क्रांतिकारी कार्य, संघर्ष आणि आदर्श या परिपथाच्या माध्यमातून भावी पिढीपर्यंत पोहोचणार आहेत. महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाने हाती घेतलेला हा उपक्रम, इतिहास, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तन यांना जोडणारा प्रेरणादायी प्रवास आहे. या परिपथामुळे अनुयायी, पर्यटकांना डॉ. बाबासाहेबांच्या महत्त्वाच्या स्थळांना भेट देण्याची आणि त्यांच्या विचारसंपदेचा जवळून अनुभव घेण्याची संधी मिळेल. हा केवळ प्रवास नसून, समानता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या मूल्यांची अनुभूती आहे, असे पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई म्हणाले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीटमध्ये मुंबईतील चैत्यभूमी, राजगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स व कॉमर्स महाविद्यालय, वडाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, परळमधील बीआयटी चाळ, सिद्धार्थ महाविद्यालय, फोर्ट या स्थळांचा समावेश आहे. या टूर सर्कीटच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली स्थळे आणि प्रेरणादायी जीवनाचा प्रवास, सामाजिक समता, शिक्षण आणि संविधान निर्मितीतील योगदानाचे महत्त्व सर्व सामान्य नागरिक व पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा हा शासनाचा प्रयत्न आहे.

टूर सर्कीट अंतर्गत दररोज ३ बसेस उपलब्ध करण्यात आल्या असून प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश देण्यात येईल. सहलीमध्ये सहभागी होणारे पर्यटक/अनुयायी यांच्यासाठी निःशुल्क प्रवास, सहल मार्गदर्शक, अल्पोपहार आदी सोयी-सुविधा पर्यटन संचालनालयाद्वारे पुरविण्यात येणार आहेत. पर्यटन संचालनालयाने या सर्किटचे योग्य नियोजन केले असून पर्यटकांना सर्वोत्तम अनुभव देण्यासाठी हे टूर सर्किट महत्त्वपूर्ण ठरेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीटचा शुभारंभ ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता वीर सावरकर राष्ट्रीय स्मारक समोर गणपती मंदिर, शिवाजी पार्क येथे पार पडेल. सदर टूर सर्कीटची सुरुवात चैत्यभूमी, दादर, मुंबई येथून सकाळी ९.३० वाजता होऊन सहलीचा समारोप चैत्यभूमी दादर येथे होणार आहे.

टूर सर्कीटसाठी संपर्क :
सूरज चतुर्वेदी - ८१०८१७५५३०
पवन पवार - ७६६६६०३२११
पर्यटन संचालनालय चॅटबोट क्र - ९९९३३०८८८३